# कार्यालय, शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, सिव्हिल लाईन, नागपूर

## नमुना दोन

3337

ग्राम : नागपूर शहर
दुरध्वनी :- 0712-2560902
ई मेल :- ssanagpur1@yahoo.co.in
फॅक्स :- 0712-2549149

जावक क्र: जिपना/शिवि/प्राथ./RTE/शा. मा./ /2022
कार्यालय, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नागपूर
विभाग - नागपूर, राज्य - महाराष्ट्र.
दिनांक : 24/04/2022

प्रति,
**अध्यक्ष/सचिव,**
**दि. मोऊटफोर्ट एज्युकेशन सोसायटी,**
**५३, मालवीय नगर , खामला, नागपूर.**

**विषय :- बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009 यांच्या कलम 18 च्या प्रयोजनार्थ,बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम 2011 मधील पोट-नियम (4) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.**

उपरोक्त विषयान्वये आपल्या सन २०२२-२३ च्या प्रस्तावानुसार आणि त्यानंतर यासंदर्भात शाळेशी केलेला पत्रव्यवहार/ शाळेची केलेली तपासणी या आधारे **मी रोहिणी कुंभार,शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद नागपूर, 01/04/2022 ते 31/03/2025** पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी इयत्ता 1 ते 8 करीता **के.जॉन पब्लीक स्कुल, अजांनी व्हिलेज, सावनेर ,जि. नागपूर. (माध्यम - इग्रंजी )** या शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे. **वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पुर्ततेच्या अधीन आहे.**

1. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.
2. बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009 ( जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, 2011 ( जोडपत्र दोन ) मधील तरतुदींचे शाळा पालन करील.
3. शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना, पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान 25 % मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणाकाचे अनुपालन करण्यात येईल.
4. परिच्छेद 3 मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरीता शाळेला अधिनियमाच्या कलम 12 (2) नुसार प्रतिपुर्ती मिळेल. अशी प्रतिपुर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.
5. संस्था / शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही. आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा तिच्या माता-पित्यास किंवा पालकांना भाग पाडणार नाही.
6. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी, धर्म जात किंवा वंश, जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.
7.**(एक)** शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.
**(दोन)** कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.
**(तिन)** कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.
**(चार)** प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, नियम 23 अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.
**(पाच)** विकलांग/ विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांचा अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करण्यात येईल.
**(सहा)** अधिनिनियमाच्या कलम 23 (1) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणाया शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण करणा-या शिक्षकांना अशी किमान अर्हता 5 वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

K.John Public School, Khapa Road, Saoner

PRINCIPAL
K JOHN PUBLIC SCHOOL (CBSE)
CBSE AFF. NO.: 1130257
KHAPA ROAD, SAONER
441107

9. शाळा, अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

10. शाळा अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणाकांचे पालन करील. मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध सुविधा खालीलप्रमाणे होत्या.

- शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ - **3760.96 चौ. मि.**
- एकूण बांधकाम क्षेत्र - **929.36 चौ. मि.**
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ - **1128.35 चौ. मि.**
- वर्गखोल्यांची संख्या - **35**
- कार्यालय-नि-भांडार-नि-मुख्याध्यापकांची खोली - **होय.**
- मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधन गृहे- जेथे वापरण्यासाठी व प्रसाधान गृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल. - **आहे.**
- पिण्याच्या पाण्याची सुविधा - **आहे.**
- दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाक घर- **लागु नाही.**
- अध्यापन-अध्यापन साहित्य/ खेळ व क्रीडा विषयक सामुग्री/ग्रंथालय यांची उपलब्धता - **होय.**
- वाचन साहित्य विनासायास उपलब्ध - **होय.**
- सर्व सुविधा विना अडथळा उपलब्ध आहेत काय?- **होय.**
- शाळेला संरक्षण भिंत आहे काय?- **आहे.**

11. मान्यता नसलेल्या वर्ग किंवा तुकडया, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र, चालविता येणार नाहीत.

12. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

13. शाळा, सोसायटी नोंदणी अधिनियम, 1860 (1860 चा 21) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, 1950 अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

14. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरीता किंवा कोणत्याही नफा मिळविण्याकरीता चालविण्यात येत नाही.

15. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमानुसार योग्य लेखा विवरण पत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरण पत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकायाकडे पाठविण्यात यावी.

16. तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता सांकेतांक **27090400102** असा आहे, हा या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करतांना कृपया तो नमूद करावा, याची नोंद घ्यावी.

17. शिक्षण संचालक/जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.

18. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही नुतनीकरण असल्यास नुतनीकरण केल्याची सुनिश्चित करावी.

19. बालकांच्या मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 प्रमाणे शाळेला आवश्यक असणाया उपरोक्त त्रुटींची पुर्तता दिनांक **31.03.2025** पर्यंत पूर्ण करण्यात याव्यात. ***अन्यथा आपल्या शाळेची मान्यता त्यापुढे आपोआप संपुष्टात येईल.***

PRINCIPAL
K JOHN PUBLIC SCHOOL, (CBSE)
CBSE AFF. No.: 1130257
KHAPA ROAD, SAONER
NAGPUR - 441107

Manager
K.John Public School
Khapa Road Saoner

(रोहिणी कुंभार)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, नागपूर

**प्रतिलिपी :-**

मुख्याध्यापक, **के.जॉन पब्लीक स्कुल, अजांनी व्हिलेज, सावनेर ,जि. नागपूर.** यांना माहितीस अग्रेषीत.